www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १२९ वा बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514



जनता दल सेक्युलर महाराष्ट्र पक्षाच्या (सचिव) व रायगड जिल्हा प्रभारीपदी श्री. सुनिल कृष्णाजी पोतदार यांची नियुक्ती ( छायाचित्र दैनिक युवक आधार )

## नाराजीच्या चर्चेतच एकनाथ शिंदेंनी दिल्ली विधानसभा निवडणुकीबाबत घेतला मोठा निर्णय

मुंबई - महाराष्ट्रात सध्या एकनाथ शिंदे यांच्या नाराजीच्या बातम्या चर्चेत आहेत. रायगड, नाशिक पालकमंत्रिपदावरून शिंदेंच्या शिवसेनेत नाराजी आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी या २ जिल्ह्याच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. अशातच शिवसेनेचे प्रमुख नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीबाबत भाजपा अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना पत्र लिहून त्यांच्या पक्षाचं भाजपाला समर्थन असल्याचं जाहीर केले आहे. एकनाथ शिंदे यांनी पत्रात लिहिलंय की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारधारेवर आमचा शिवसेना पक्ष पुढे जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीएचा घटक पक्ष



आणि सदस्य असल्याचा अभिमान आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष म्हणून आम्ही येत्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना समर्थन देण्याचा निर्णय घेतला आहे. मी शिवसेनेच्या राज्य पदाधिकारी यांना भाजपा प्रदेश कार्यालयासोबत संवाद साधून निवडणूक प्रचारात सक्रीय सहभाग घेण्याचे आदेश दिलेत असं त्यांनी सांगितले आहे. दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी जाहीर झालेली निवडणूक आता महत्त्वाच्या वळणावर आली आहे. सत्ताधारी आम आदमी पक्ष, भाजप आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांनी २१ दलबदलूंना निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. यात पहिल्या क्रमांकावर असलेल्या भाजपने आप, काँग्रेस आणि बसपामधून आलेल्या ९ दलबदलूंना उमेदवारी दिली आहे. मागील निवडणुकीत भाजप आणि काँग्रेसच्या तिकीटवर लढणाऱ्या आठ उमेदवारांचा पराभव झाला होता. राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्र लढणार- दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत एकला चलोची भूमिका घेत शुक्रवारी ३० उमेदवारांची घोषणा केली. भाजपाने शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, जदयू, आणि लोजपा या रालोआतील घटक पक्षांना एकएक जागा देण्याची तयारी दर्शविली होती. मात्र, शिवसेनेने माघार घेतली. त्यामुळे राष्ट्रवादीने स्वतंत्र निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. दिल्ली विधानसभा निवडणुकीत एनडीएचा घटक पक्ष असलेल्या रामदास आठवले यांचा आरपीआय पक्षही स्वबळावर निवडणूक लढवत आहे.

## उरण तालुक्यातील जसखार गावात राहत्या घराला आग, घरमालकाचे लाखोंचे नुकसान

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**–उरण तालुक्यातील जसखार गावात मनोज चंद्रकांत भोईर यांच्या राहत्या घराला आग लागण्याची घटना मंगळवारी दि२१ दुपारच्या सत्रात घडली आहे.घरात कोणीही नसल्याने घरातील महिला,मुले थोडक्यात बचावली आहेत.सदर आगीची माहिती गावातील रहिवाशांकडून सिडकोच्या अग्निशमन दलाच्या जवानांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आगी विझविण्यासाठी प्रयत्न केले. आग ही शाँटशर्किट मुळे लागली असावी असे तपासात पुढे येत असले तरी घरातील पैसे, मौल्यवान वस्तू,दागिने, फ्रिज, टिव्ही सह इतर जीवनावश्यक वस्तू जळून नष्ट झाल्या आहेत.जसखार गावातील रहिवासी मनोज चंद्रकांत भोईर हे मंगळवारी दिनांक २१रोजी नेहमी प्रमाणे कामावर गेले होते.त्याची पत्नी ही बाजूला सुरू असलेल्या त्यांच्या नव्या घराच्या बांधकामा ठिकाणी आपल्या राहत्या घराचा दरवाजा बंद करून गेली होती.त्यावेळी दुपारच्या सत्रात त्या राहत असलेल्या घराला आग लागण्याची बातमी तसेच रहिवाशांचा आरडाओरड सुरू असल्याची माहिती त्यांना मिळाली.रहिवाशांनी प्रसंग सावधगिरी बाळगून सदर घटनेची माहिती सिडकोच्या अग्निशमन दलाच्या जवानांना दिली .अग्निशमन दलाच्या जवानांनी घटना स्थळी धाव घेऊन आग विझविण्यासाठी प्रयत्न केले.मात्र घरात कोणीही नसल्याने घरातील माणसे थोडक्यात बचावली आहेत.सदर आग ही शाँटशर्किट मुळे लागली असल्याची माहिती मिळत आहे.या घटनेची माहिती उरण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी संतोषसिंग डाबेराव, सरपंच काशिबाई ठाकूर, ग्रामविकास अधिकारी रुपंम गावंड, तलाठी ज्योती भालचिन यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामे सुरू केले आहे.घर मालक मनोज चंद्रकांत भोईर यांच्या म्हणण्यानुसार नव्या घराच्या बांधकामासाठी आणलेली रोख रक्कम ५० हजार, घरातील इतर असणारे पैसे, मौल्यवान वस्तू दागिने फ्रिज, टिव्ही संच तसेच जीवनावश्यक वस्तू जळून नष्ट झाल्याची माहिती समोर येत आहे.



## श्री साईसेवक वारकरी प्रतिष्ठान विचुंबे येथे साई पदयात्रा पालखी सोहळ्या निमित्त साई भंडारा

**दैनिक युवक आधार**

**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**–श्री साई सेवक वारकरी प्रतिष्ठान विचुंबे वर्ष ७ वे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विचुंबे ते शिर्डी पदयात्रा करून आलेला भाविकांनी साई भंडारा कार्यक्रम दिनांक 20 जानेवारी रोजी विठ्ठल रुक्माई मंदिर येथे विचुंबे आयोजन करण्यात आले होते व साई भक्तांची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

साई भक्तांच्या मनोरंजनासाठी. साई भंडारा निमित्त शारदा संगीत सुरेल ऑर्केस्ट्रा ठेवण्यात आले होते गायक दिलीप म्हात्रे.रेश्मा घाटे. सोनिया कडव. दक्षता कडव. सर्वेश म्हात्रे. साई गीत.भावगीत,भक्ती गीत, लोकगीते व कोळीगीते.

गाणी म्हणून साईभक्तांन ची मने जिंकली यावेळी त्यांना महत्त्वाची साथ दिली ढोलकी तबला- संतोष खैरे. की बोर्ड- सुशील म्हात्रे, ऑटो पॅड- नितेश पाटील,टाळ पी.जी. पाटील,यावेळी विचुंबे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती व पाहुण्यांचा सन्मानचिन्ह शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

==============================











## शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते व पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील साहेब यांचा वाढदिवस संपन्न







**दैनिक युवक आधार**

**सुरेश भोईर ( कार्यकारी संपादक)**- दिनांक २०जानेवारी रोजी पनवेल येथील वलप गावचे शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते व पंचायतीचे पनवेल समितीचे माजी सभापती पनवेल विधानसभेचे अध्यक्ष शांत स्वभावाचे पक्षाशी एकनिष्ठ व सर्वांना सोबत घेऊन विकासाची कामे करून घेणारे गरीब गरजूंची कामे करून त्यांना सतत मदत करणारे काशिनाथ पाटील साहेब यांचा वाढदिवस वलप या ठिकाणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते व कार्यकर्ते फुलगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## चला खेळूया पैठणी कार्यक्रमाला शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर**–मकरसंक्रांत म्हटलं की महिलांमध्ये एक वेगळाच उत्साह दिसून येतो. मकरसंक्रांतीनंतर घरोघरी हळदीकुंकूचा कार्यक्रम होतो. ही परंपरा जपत उलवे येथील शिव संघर्ष प्रतिष्ठान तर्फे हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. शेकापचे नेते प्रीतम जे एम म्हात्रे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन सोहळा केक कापून साजरा करण्यात आला. आपल्या भगिनींना घरातील व्यस्त जीवनातून स्वतःसाठी वेळ काढून करमणुकीसाठी “चला खेळूया पैठणी” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला उलवे शहरामधील महिला भगिनींची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांचे सह त्याची पत्नी सौ.ममता प्रितम म्हात्रे, परिसरातील ज्येष्ठ नागरिक , शिवसंघर्ष प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. आपल्या रूढी परंपरा जपत अशा प्रकारे श्री अखिल यादव यांच्या शिवसंघर्ष प्रतिष्ठान मार्फत उलवेकरांसाठी उत्कृष्ट नियोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल प्रीतम म्हात्रे यांनी त्यांचे मनापासून आभार मानले.

==================



## बोकडविरा गावात अखंड हरिनाम सोहळा-2025 चा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतीनिधी-** प.पू.सद्गुरू वै.ह.भ.प.वामनबाबा(तळोजे),अप्पा माऊली (पनवेल),हिरजीबाबा (वाघिवली),विश्वनाथबाबा (बेलापुर),श्री जीवनमुक्तस्वामी(उरण),गोपाळबाबा (वहाळ)व अहिल्याबाई यांच्या कृपाशिर्वादाने,ग्रामस्थ मंडळ बोकडविरा,व संततुकोबाराय गाथा (बाळक्रीडा) संगीत पारायण मंडळ बोकडविरा आयोजित अखंड हरिनाम सोहळा 2025 चा शुभारंभ दि.19 जानेवारी 2025 रोजी टाळ मृदुंगच्या गजरात मोठया उत्साहात करण्यात आला. गावच्या सरपंच सौ.अर्पणा पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाच्या मूर्तीचे पूजन करून व उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील,समवेत ध्रुव पाटील व गौरव पाटील. यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून सूर्यकांत पाटीलयांच्या हस्ते कलश पूजन, रमेश पाटील यांच्या हस्ते वीणा पूजन,ह.भ.प.गणेश




ठाकुर यांच्या हस्ते ध्वजपूजन,कृष्णकुमार पाटील यांच्या हस्ते मृदुंगपूजन,ग्रंथपूजनसौ. हेमलता पाटीलव सौ.मानसी पाटील यांच्या हास्ते करण्यात येऊन हरिनाम सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला.तर गाथेच्या सांगतेचे पूजन सुभाष पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.रविवार दिनांक 19 जानेवारी रोजी पहाटे 05 वाजता काकड आरतीने या हरिनाम सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला असून सोमवार दिनांक 20 जानेवारी रोजी दीपोत्सव व पालकी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण गावातून या पालखि दिंडीची मिरवणूक काढण्यात आली समस्त ग्रामस्थांनी या सोहळ्यात सहभाग घेतला ,दैदिन काकड आरती,प्रवचन,ग्रंथवाचन,,गाथा पारायण,जागर-भजन कीर्तन, हरीपाठ आणि मंगळवारदि.21 रोजी सकाळी 10 ते 12 वाजता ह.भ.प. मनोज महाराज ठाकुर (बेलपडा)यांच्या काल्याच्या कीर्तनाने या हरिनाम सोहळ्याची सांगताकरण्यात आली पंचक्रोशिंतील भाविकांनी या हरिनाम सोहळ्यात मोठया प्रमाणात सहभाग घेतला.

===================



# 41 वा रायगड भारत स्काऊट गाईड कब-बुलबुल भव्य मेळावा दिमाखात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**-आज दि.19/1/2025 रोजी रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील द्रोणागिरी पर्वत पायथ्याशी निसर्गाच्या कुशीत वसलेल्या श्रीशैल्य प्रकल्प डाऊरनगर परिसरात रायगड भारत स्काऊट व गाईड भव्य मेळाव्याचे उद्घाटन मा.श्रीम. पुनिता गुरव मॅडम शिक्षणाधिकारी प्राथमिक रायगड व मा.श्री.नितीन भोईर उद्योगपती तथा समाजसेवक उरण मा श्री संतोषजी शेडगे उपशिक्षणाधिकारी अलिबाग मा.सौ. प्रियंका म्हात्रे मॅडम गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती उरण मा.सौ सोनाली राठोड मॅडम DGO पेण रायगड मा.श्री प्रशांत गायकवाड सर रायगड जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट,मा.श्रीम. सरिता डफळ मॅडम रायगड जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड, मा.श्री ज्ञानेश्वर कोठावदे सर माजी मुख्याध्यापक एन आय हायस्कूल उरण मा. प्रथमेश पाटील माजी आदर्श स्काऊट एन आय हायस्कूल उरण, सर्व स्काऊट गाईड संचालक मंडळ, उरण तालुका सर्व केंद्रप्रमुख, सर्व नियोजन समितीचे प्रमुख, सदस्य शिक्षक बंधू भगिनी व अन्य मान्यवर यांच्या शुभहस्ते करण्यातआले.सदर मेळावा रायगड भारत स्काऊट व गाईड जिल्हा कार्यालय व रायगड जिल्हा शिक्षण विभाग यांचे संयुक्त विद्यमाने दि.16/1/2025 ते 19/1/2025 चार दिवशीय निवासी मेळावा इयत्ता 5वी ते 7वी व 8वी ते 10वी या दोन गटात घेण्यात आला.16 /1/2025 रोजी कार्यालयीन ध्वजारोहण, आगमन, तंबूरचना,मार्गदर्शन,संचलन, रात्री शेकोटी कार्यक्रमात मुलांचे व सामुहिक सांस्कृतिक कार्यक्रम व दिवेबंद पहारा असा दिनक्रम होता. तर पुढील दिवसात रामधुन बीपी सिक्स,तंबू स्वच्छता,तंबूनिरीक्षण,ध्वजारोहण, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा,रात्री शेकोटी कार्यक्रम, द्रोणागिरी किल्ला हाईक,गावची जत्रा,उरण शहर शोभायात्रा,सर्वधर्मीय प्रार्थना,तर 18 जानेवारी 2025 रोजी कब बुलबुल साठी विशेष मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात 537 विद्यार्थी व 63 शिक्षक असे एकूण 600 कब बुलबुल कब लीडर व क्लाफ लीडर सहभागी झाले होते.विविध नाविन्यपूर्ण स्पर्धा राबवून हा मेळावा संपन्न झाला. या 41 वर्षातील महाराष्ट्रातील सर्वात मोठा मेळावा म्हणून रायगड जिल्हा भारत स्काऊट गाईड व कब-बुलबुल मेळावा वेगवेगळ्या दानशूर दात्यांच्या सहकार्याने संपन्न झाला. या चार दिवसात अनेक मान्यवरांनी भेटी देऊन विद्यार्थी शिक्षक व आयोजक, रायगड युनिटचे भरभरून कौतुक व अभिनंदन केले. या मेळाव्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे मा.श्री.संतोषजी शेडगे साहेब उपशिक्षणाधिकारी प्राथमिक अलिबाग यांच्या संकल्पनेतून स्काऊट- गाईड व कब-बुलबुलच्या रायगड इतिहासात पहिल्यांदाच रायगड जिल्हा परिषद पी.एम.श्री.13 शाळा




व अन्य 19शाळा सहभागी झाल्या होत्या. जवळजवळ 650 स्काऊट- गाईड व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक स्काऊटर- गाईडर व नियोजन समिती असे मिळून 800 लोक दररोज निवासी स्वरूपात रहात होते. या सर्व विद्यार्थ्यांचा सकाळचा चहा नाश्ता दुपारचा चहा सकाळ संध्याकाळची भोजन निवासाची सोय निवासाची व्यवस्था मुला मुलींना आंघोळीसाठी गरम पाण्याची सोय व सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट्स तसेच प्रोत्साहन पर मार्गदर्शन करणारे उद्योजक दानशूर व्यक्तिमत्व तन-मन-धनाने मदत करणारे मा श्री नितीनजी भोईर व त्यांचे सर्व कुटुंबीय यांच्यावतीने करण्यात आले. तर सर्व लोकांना चार दिवस संपूर्ण पाण्याची सोय आदर्श स्काऊट एन.आय. उरण हायस्कूल श्री प्रथमेश पाटील यांच्यावतीने करण्यात आली तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी मान. श्री उन्मेष वाघ साहेब चेअरमन जे. एन. पी. ए उरण यांनी संपूर्ण किट ची व्यवस्था करून दिली. माननीय श्री ज्ञानेश्वर कोठावदे सर यांनी चार दिवस आरोग्यसेवा पुरवली विद्यार्थ्यांच्या विविध कौशल्यांना उत्तेजित करण्यासाठी तसेच शिस्त व स्वावलंबनाला चालना देण्यासाठी हा मेळावा निश्चित फलदायी ठरणारा असा होता. या मेळाव्याला भेट देण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक उपशिक्षणाधिकारी मा.श्री सुनिल भोपळे साहेब, मा.श्री.संतोष शेडगे साहेब उपशिक्षणाधिकारी श्रीमती कल्पना काकडे मॅडम विस्ताधिकारी अलिबाग, मा.श्री.मोहिते साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पनवेल, मा.श्री.साबळे साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अलिबाग, मा.श्री.सचिन पाटील मा.श्री कालंग सर, मा.श्री धुळे सर जिल्हा परिषद , मा.शेडगे मॅडम, विविध पदाधिकारी, अधिकारी, शिक्षक वर्ग,पालक भेट देत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या तंबू सजावटीचे कौतुक करत होते. आज मेळाव्याचा शेवटचा दिवस विद्यार्थ्यांनी चार दिवस विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या प्राविण्याचा गुण गौरव करण्याचा दिवस अर्थात बक्षीस वितरण... या कार्यक्रमाला मा.श्री नितीनजी भोईर उद्योजक व या कार्यक्रमाचे दाते,मा.श्री.महेशजी म्हात्रे माजी पं.स सदस्य तथा संचालक सदस्य एन.आय.उरण.मा.श्री. रवी दादा भोईर समाजसेवक मा.श्री.सुनील भोपळे साहेब उपशिक्षणाधिकारी प्राथमिक अलिबाग माश्री शेडगे साहेब उपशिक्षणाधिकारी प्राथमिक अलिबाग मा.श्री.अरूण सप्ताळे साहेब भारत स्काऊट गाईड महाराष्ट्र राज्यचिटणीस मा.श्री.गोपाळ जाधव केंद्रप्रमुख व अन्य पदाधिकारी, अधिकारी मेळावा नियोजन सर्व समिती प्रमुख व सर्व सदस्य जिल्ह्यातून आलेले सर्व शिक्षक बंधू भगिनी व सर्व स्काऊट गाईड उपस्थित होते.विविध स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त स्काऊट गाईड व शाळांचा गुणगौरव करण्यात आला. तर लहान गट व मोठा गट यामध्ये सर्वाधिक बक्षीसे प्राप्त करणारी शाळा डेविड इंग्लिश मिडीयम स्कूल चोंढी अलिबाग या शाळेला दोन्ही गटात या वर्षाचा चॅम्पियन ट्रॉफी मिळवण्याचा मान मिळाला. या शाळेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन व कौतुक करण्यात आले. व चॅम्पियन ट्रॉफी प्रदान करण्यात आली. जिल्ह्यातून एका बेस्ट स्काऊट- स्काऊटर व बेस्ट गाईड- गाईडर पुरस्कार मान्यवरांच्या शुभहस्ते देण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उरण गटशिक्षणाधिकारी सौ.प्रियंका म्हात्रे मॅडम अहोरात्र मेहनत घेणारे मा.श्री सोमीनाथ खरमाटे सर एनआय स्कूल सर्व संचालक मंडळ जिल्हा स्काऊट गाईड कार्यालय पेण अधिकारी वर्ग,उरण तालुक्यातील माननीय पोलीस निरीक्षक पोलिस ठाणे उरण,सर्व केंद्रांचे केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ती उरण, श्री. संजय होळकर सर आदर्श शिक्षक पी.एम.श्री. शाळा मुळेखंड,(पी.एमश्री.शाळांचे प्रमुख) सर्व समित्यांचे समिती प्रमुख शिक्षक बंधू भगिनी, उरण तालुका आरोग्य विभाग, श्रवण बिल्डिंग ए विंग, बी विंग, कीर्तन बिल्डिंग, सद्गुरू कृपा बंगला व जुईली मॅडम बंगला या इमारतीतील रूमचे मालक चार दिवस अखंड भोजन नास्ता, चहा देणारे व सर्व अन्न बनवणारे पुरुष महिला भगिनी यांच्या सहकार्यातून व मदतीने हा मेळावा यशस्वीरित्या दिमाखात पार पडला. या दोन्ही कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन माननीय श्री.संतोष दाते सर जिल्हा कार्यालय पेण यांनी केले.

## किल्ले हरिहर वर सह्याद्री प्रतिष्ठानचा पुरातन पायरी मार्गाला पुनर्जीवीत करण्याचा प्रयत्न



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**-किल्ले हरिहर वर सह्याद्री प्रतिष्ठानचा पुरातन पायरी मार्गाला पुनर्जीवीत करण्याचा प्रयत्न नाशीक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर जवळ असलेल्या महाराष्ट्रातील अवघड श्रेणीतील किल्ले हरिहर येथे सह्याद्री प्रतिष्ठान नाशिक विभाग यांच्या माध्यमातून गेल्या १ वर्षापासून दुर्गसंवर्धन कार्य सुरू आहे. गडावरील उत्तर बाजूस असलेला गुप्त दरवाजा व पायरी मार्ग यावेळी मोकळा करण्यात येत आहे. आतापर्यंत एकूण १७ मोहीम गडावर झालेल्या आहेत. लवकरच हे काम सह्याद्रीच्या दुर्ग सेवकांच्या माध्यमातुन पूर्ण होणारं असून सह्याद्री प्रतिष्ठानने सर्व शिवभक्त व दुर्गप्रेमी यांना या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.काळाच्या ओघात दगड माती याने बुजलगेलेला हा पुरातन मार्ग येणाऱ्या पिढ्यांना पाहायला मिळावा तसेच पूर्वजांनी तयार करून ठेवलेली ही भव्यदिव्य वास्तू पुन्हा लोकांसमोर यावी या प्रामाणिक उद्देशाने सह्याद्री प्रतिष्ठानचे दुर्ग सेवक गेले वर्षभर या ठिकाणी दर शनिवार रविवार सतत मोहिमा घेऊन श्रमदानातून काळाच्या पडद्याआड गेलेली ही वास्तू म्हणजेच पुरातन पायरी मार्ग मोकळा करण्याचे काम करीत आहेत यासाठी अनेक शिवभक्तांनी यात सहभागी होण्याचे आवाहन देखील करण्यात आलेले आहे

## आदी मल्टीस्पेसिलिटी हॉस्पिटल स्कीनोम स्किन क्लिनिक कामोठे आणि ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर ( कार्यकारी संपादक)-** 19 जानेवारी सायंकाळी ५:३० वाजता कामोठे से. १८ येथे आदी मल्टीस्पेसिलिटी हॉस्पिटल येथे डॉ. शितल गोसावी व संदीप गोसावी यांनी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कामोठेचे नगरसेवक विकास घरत. कामोठे पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे. नगरसेविका कुसुम म्हात्रे. बि. के. चित्रा कामोठे सेंटर इनचार्ज . बि. के. तारा पनवेल सेंटर इनचार्ज . बि. के. निर्मला नेरूळ सेंटर इनचार्ज सौ.रेश्मा कुरूप रोटरी प्रेसिडेंट. सौ. गीता कुदळकर. सौ. रत्ना पानवेलकर संगीतकार. सौ साक्षी सागवेकर उपस्थित होते. बि. के. चित्रा कामोठे यांनी ब्रह्मकुमारी संस्थेचे परिचय दिला. बी.के. तारा यांनी हळदीकुंकवाचे आध्यात्मिक महत्त्व सांगितले नगरसेवक विकास घरत यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.व मकर संक्रांतीचे महिलांना संदेश दिले की हळद अंगाला सुरूप असते. कुंकू सौभाग्याचं लेणं असतं.नारी सबसे भारी. तिळगुळ घ्या गोडगोड बोला. असे महत्व पटवून दिले. व कामोठे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी सध्या होत असलेल्या सायबर गुन्ह्यांविषयी महिलांना माहिती पटवून दिली कार्यक्रमाबद्दल खूप खूप शुभेच्छा व्यक्त केल्या आणि कार्यक्रमाची प्रशंसा केली डॉ. शितल गोसावी यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगताना सांगितले की हलदीकुंकवाच्या निमित्त उपस्थित असलेल्या सर्व स्त्रियांना भौतिक वानासोबत अलौकिक वाण राजयोग द्वारा प्राप्त व्हावा आणि सौभाग्य प्राप्त व्हावे याच बरोबर आज स्त्रियांमध्ये डायबिटीज.बीपी. सरवाइक कॅन्सर. खूप वाढत आहे आणि आता अशी वेळ आली की स्त्रियांनी टेन्शन न घेता अटेंशन घेता आले पाहिजे की कसे राजयोगाद्वारे यावर मात करता येईल सर्वात खुशीची गोष्ट अशी आहे की या वर्षापासून आदी हॉस्पिटल कामोठे फ्री गर्भ संस्काराचा खूप चांगला उपक्रम राबवत आहे असे डॉ. शितल गोसावी व डॉ.संदीप गोसावी यांनी उपस्थित महिलांना सांगितले.

आदी हॉस्पिटल
हेल्पलाइन नंबर
-7738190687







## भव्य नागरी सत्कार समारंभ,नँशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड पुरस्कारसाठी प्रस्ताव पाठवण्याचा तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (आनंद पवार)**-तथागत बहुउद्देशीय संस्था, मेहकर द्वारे आयोजित राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहायता महिला बचत गट,तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील कर्तृत्ववान व्यक्ती तसेच युवक युवतींनचा नँशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार असल्याची घोषणा तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख ३१जानेवारी २०२५ आहे. सामाजिक राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे व्यक्तींना नँशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. पुरस्कार प्राप्त व्यक्तींची निवड नेतृत्व गुणांवर आधारित असून ज्यात प्रामाणिक पणा, सचोटी,आत्मीयता गुण नियमितपणे दिसून येतात शिवाय व्यक्तीचं संवाद कौशल्य,श्रवण कौशल्य,तसेच ती व्यक्ती परस्पर नातेसंबंध किती कौशल्याने हाताळुन सर्वसामान्य जनतेशी सामाजिक बांधिलकी पद्धतीने जोपासते अशा वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या व्यक्तींना हा पूरस्कार दिला जाणार आहे. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना, तसेच युवक युवतींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार सोहळा राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीपभाऊ गवई यांनी दिली. नँशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड या पुरस्काराचे गावपातळीवर मेहकर बुलढाणा येथे वितरण होणार आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह ट्राफी, मेडल,पंचरंगीदुपट्टा, असे या पुरस्काराचे स्वरूप ठेवण्यात आले आहे.यासाठी इच्छुकांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे अशा कर्तुत्ववान व्यक्तींनापुरस्कार वितरण व जेष्ठ नागरिक,माजी सैनिक यांचा भव्य नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात येत आहे.तरी इच्छुकांनी आपला प्रस्ताव तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांच्या संपर्क कार्यालय मिलिंद नगर वार्ड नं १९ मेहकर ता. मेहकर जिल्हा बुलढाणा येथे यांच्याकडे सादर करावयाचा आहे. किंवा मो. 9970467141, 9881199852 या संपर्क वर पाठवून संपर्क साधावा.त्या अनुषंगाने सामाजिक राजकिय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान सामाजिक व राजकिय क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच युवक युवतींना आपला कार्य अहवाल सादर करण्याचे आव्हान तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी केले आहे.



## सांगली - मिरजेत नशेच्या गोळ्या व इंजेक्शनचा साठा जप्त

■ साडे चौदा लाखांचा मुद्देमाल जप्त ■ तीन जणांना अटक ■ महात्मा गांधी चौक पोलिसांची कारवाई




**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी-**सांगली आणि मिरजेत नशेची औषधे विकणाऱ्या टोळीला मिरजेच्या महात्मा गांधी चौक पोलिसांनी जेरबंद केल आहे. या टोळीतील तीन जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या कडून ६ लाख १६ हजार रुपये किमतीच्या नशेच्या गोळ्या आणि इंजेक्शन तसेच ८ लाख ३० हजार रुपये किमतीची चारचाकी व मोटारसायकल असा एकूण १४ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी रोहित अशोक कागवाडे, ओंकार रवींद्र मुळे आणि आशपाक बशीर पटवेगार अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.मिरज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानच्या मागे ही कारवाई करण्यात आली. त्यांच्यावर महात्मा गांधी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नशेच्या गोळ्या व इंजेक्शन विक्री करणारे मोठे रॅकेट असण्याची शक्यता पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी व्यक्त केली आहे. पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अप्पर पोलीस अधीक्षक रितू खोकर, पोलीस उप अधीक्षक प्रणील गिल्डा, महात्मा गांधी चौक पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंदे यांच्या पोलीस पथकाने सदर कारवाई केली आहे.

==================

## गणेश उघडे यांची सुरक्षा असंघटित कामगार संघटना पैठण तालुका उपाध्यक्ष पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे-**पैठण तालुक्यातील मुलानी वाडगाव येथील युवा तरुण सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेले गणेश सखाराम उघडे रा. मुलानी वाडगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजी नगर यांचे शैक्षणिक, सांस्कृतिक,सामाजिक, क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य पाहता सुरक्षा असंघटित कामगार संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेत पैठण तालुका उप अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.संघटनेचे ध्येय धोरण व असंघटित कामगारांच्या समस्या जाणून घेऊन संघटनेचे पुढील उद्दिष्ट असंघटित कामगारांना न्याय हक्क अधिकार प्राप्त करुन देण्याकरिता निवड करण्यात आली आहे.सुरक्षा असंघटित कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर भाऊ बर्फे म्हारोळा यांनी संघटनेचे संपर्क कार्यालय येथे नियुक्ती पत्र देऊ पुढील कार्यासाठी शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले. सुरक्षा असंघटित कामगार संघटनेचे बिडकीन सर्कल अध्यक्ष दिलीप जोशी, लोहगाव सर्कल अध्यक्ष अशोक काळे ,निलजगाव सर्कल अध्यक्ष संजय पवार, आदींची यावेळी उपस्थिती होती. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.




## जानपीर विद्यालयाचे शासकीय ग्रेड चित्रकला स्पर्धेत अभूतपूर्व यश

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**जानपीर माध्यमिक विद्यालय नाळवंडी, कारेगाव ता.पाटोदा जि.बीड या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शासकीय इंटरमिजिएट व इलिमेंटरी परीक्षेत ३७ विद्यार्थ्यांना यश संपादन केले. त्या मध्ये इंटरमिजिएट इलिमेंटरी परीक्षेत यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे इंटरमिजिएट परीक्षा- एकूण १९ विद्यार्थी पास १) माहीन मुजीब सय्यद (B ग्रेड), २) समर्थ शरद येवले (B ग्रेड), ३) संस्कृती राम येवले (B ग्रेड), ४) अपूर्वा संजय अतकरे (B ग्रेड), एलिमेंटरी परीक्षा एकूण १८ विद्यार्थी पास १) नूतन लक्ष्मीकांत उदमले (A ग्रेड), २) पायल रामदास कटाळे (B ग्रेड), ३) संकेत अनिल राऊत (B ग्रेड), या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व चित्रकला विभाग प्रमुख खान सर तसेच सहकार्य करणारे शिक्षक जयराम यादवसर, असद शेख सर, कठाळे सर, शरद पाटील सर यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन विद्यालयाच्या वतीने विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शेख के.एस.यांनी केले. त्याच बरोबर या यशस्वी विद्यार्थ्यांचे नाळवंडी, डोंगरकिन्ही, कारेगाव, भाटेवाडी, रंदवेवस्ती, जन्नेवाडी, कठाळवाडी व मोरजळवाडी गावातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन केले. या वेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

दखल

# लायन्स सरगम तर्फे आदिवासी वाडीमध्ये हळदी कुंकू आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)**-मकर संक्रांति निमित्त लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे वाघाची वाडी जवळील छोटी धामणी येथील आदिवासी महिलांसाठी हळदीकुंकू तसेच काही मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.या उपक्रमासाठी समन्वयाचे काम सत्कर्मश्रद्धाश्रम येथील कार्यकर्त्यांनी उत्तमरीत्या साधले. या प्रसंगी बोलताना अध्यक्ष मानदा पंडित यांनी सांगितले की सत्कर्म श्रद्धालयाचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतल्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला. याप्रसंगी उपस्थित महिलांच्या चेहर्‍यावरील आनंद बघून अतिशय समाधान वाटत आहे आणि भविष्यात सुद्धा आम्ही असेच कार्यक्रम करत राहू. या प्रसंगी लहान मुले आणि महिलांसाठी विविध मनोरंजक खेळ आयोजित केले होते त्याचा आनंद सर्व सहभागी महिला आणि मुलांनी घेतला. सर्व महिलांना संक्रांतीचे वाण देण्यात आले तसेच सर्व उपस्थितांना तिळगुळ आणि खाऊ देण्यात आला. या प्रसंगी क्लबच्या अध्यक्षा डॉ. मानदा श्री पंडित, सुषमा पन्हाळे, संध्या महानुभाव, स्वस्तिश्री पंडित, दुहिता पंडित, आदित्य दोशी तसेच सत्कर्म श्रद्धालयाचे विवेक देवगावकर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेलिंगला कार धडकल्याने सहा जण जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**-20 जानेवारी रोजी रात्री 12 च्या सुमारास मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे लेनवर कि.मी 5-300 शिवकर गावाजवळ पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत अपघात झाला असून यात सहा जण जखमी झाले आहेत.यातील टाटा सुमो व्हिस्टा कार क्रमांक एम एच 46 एन 7368 वरील चालक पंकज भगरे हे पनवेल ते सांगोला -सोलापूर असे जात होते. पुणे लेन किमी 5-300 जवळ आले असता त्यांच्या वाहनाचे समोर अज्ञात कार चालकाने अचानक ब्रेक मारल्याने सुमो कार चालक यांचा कारवरील ताबा सुटला. आणि कार पहिल्या लेनवरून अनियंत्रित होऊन डाव्या बाजूचे लोखंडी रेलींगला जोरात धडकली. आणि रेलिंगचे बाहेर जाऊन झाडाला धडकून उजवे कुशीवर पलटी झाली. या अपघातात चालक पंकज भगरे (वय.40 रा. एचडीएफसी सर्कल जवळ, सेक्टर 19, नवीन पनवेल), संजय खंडागळे (वय 55 रा. रोहिंजन ता. पनवेल) यांच्या तोंडाला व डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. तसेच आरती भगरे, प्रवीण भगरे ( दोन्ही रा. एचडीएफसी सर्कल जवळ, सेक्टर 19, नवीन पनवेल), सुजित खंडागळे, सरीता खंडागळे (दोन्ही रा. रोहिंजन) यांना किरकोळ दुखापती झाल्या असून त्यांना देवदूत रेस्क्यू टीमच्या मदतीने बाहेर काढून दवाउपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे खाजगी वाहन व आयआरबीच्या रुग्णवाहिकेने रवाना करण्यात आले असून या अपघातात कारचे नुकसान झाले आहे.



# दामोदर नागोठणेकर यांचे वृद्धापकाळाने निधन

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे वार्ताहर**-केएमजी विभागातील कुंभारआळी मधील रहिवासी तसेच बांधकाम क्षेत्रातील अतिशय कुशल कारागीर दामोदर राजाराम नागोठणेकर यांचे वयाच्या 66 व्या वर्षी रविवार 19 जानेवारी रोजी सायंकाळी 04.00 वा. च्या दरम्यान वृद्धापकाळाने निधन झाले.अतिशय शांत व प्रेमळ स्वभावाच्या दामोदर यांच्या पार्थिवावर येथील कुंभारआळी स्मशानभूमीत रात्री 10.00 वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात राजेंद्र हा मुलगा तर शितल वाडेकर,नेत्रा नागावकर,भावना वाईकर या तीन विवाहित मुली तसेच सून,जावई व नातवडे असा परिवार आहे. यांचे दशक्रिया विधी मंगळवार 28 जानेवारी रोजी तर उत्तरकार्य शुक्रवार 31 जानेवारी रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती नागोठणेकर कुटुंबियांनी दिली.




# गड-किल्ले अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा**-दैनिक युवक आधारनी रेवदंडा आगरकोट किल्ल्यातील पाच सहा दिवसापूर्वी बांधकाम अतिक्रमनाविरुद्ध आवाज उठवला होता त्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेत त्या त्या संदर्भात त्या त्या विभागाच्या सर्व सरकारी यंत्रणाला योग्य ती करवाईचे आदेश दिले आहेत .राज्यातील गड-किल्ले अतिक्रमणमुक्त करण्यासाठी राज्यातील सर्व गड किल्ल्यांवरील अतिक्रमणे 4 महिन्यात हटवा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे राज्यातील गड- किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने पाऊल उचलले आहे. राज्यातील गड किल्ल्यांवर अतिक्रमण असल्याचे राज्य सरकारच्या निदर्शनास आले आहे. खोटी कागदपत्रे ना हरकत दाखले बनवून सरकारची दिशाभूल करत आहेत खोदकाम कमानी गायब करणे भिंती, कठडे तोडणे,गेट बांधून किल्ल्यात शिवप्रेमी पर्यटक ह्यांना येण्यापासून मज्जाव करणे विविध प्रकारची गुंडगिरी करणे , किल्ल्याला धोका निर्माण होईल असं बेकायदेशीर आपल्या राजकीय पुढाऱ्याच्या जीवावर बिनधास्त कसही कामं करणं असली दादागिरी खपवून घेतली जाणार नाही हे सर्व गड-किल्ले अतिक्रमणमुक्त



करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आक्रमक पवित्रा घेतला असून 31 मे पर्यंत राज्यातील सर्व गड किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवण्याचे आदेश दिले आहेत.छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यातील गड किल्ले महत्त्वाचे आहेत. विशालगडावर झालेल्या अतिक्रमणानंतर गड किल्ल्यांच्या संवर्धनाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. विशालगडाप्रमाणे राज्यातील अनेक गड किल्ले देखील अतिक्रमित असल्याची बाब समोर आल्यानंतर सरकारने त्याबाबत काहीतरी ठोस निर्णय घ्यावा अशी मागणी केली जात होती. त्यापार्श्वभुमीवर सरकारने मोठे निर्णय घेतले आहेत.31 जानेवारीपर्यंत यादी मागवली राज्यातील गड किल्ल्यांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी राज्य सरकारच्या सर्व जिल्हाधिकार्‍यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. 31 जानेवारीपर्यंत सरकारने जिल्हाधिकाऱ्यांनी अतिक्रमणांची यादी मागवली आहे. 1 फेब्रुवारी ते 31 मे पर्यंत टप्प्याटप्प्याने अतिक्रमण हटवण्याचे आदेश देण्यात आले आहे. पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून दक्षता समितीची नेमणूक करण्यात आली आहे.समितीचे सदस्य संबंधित नागरी भागातील पोलीस आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, आयुक्त महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायत,ग्रामपंचायत वनक्षेत्र असेल तेथे संबंधित उप वनसंरक्षक, संबंधित अधिक्षण पुरातत्वविद्या, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण भारत सरकार, पुरातत्व सहाय्यक संचालक विभागीय कार्यालय महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, प्रादेशिक बंदर अधिकारी महाराष्ट्र सागरी मंडळ, निवासी उप जिल्हाधिकारी नेमले आहेत.राज्यात केंद्र संरक्षित 47 किल्ले आणि राज्य संरक्षित 62 किल्ले आहेत. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 11 सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे गड-किल्ले अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

# पनवेलच्या वाहतूक पोलिसांनी वर्षभरात 70 हजार 513 जणांवर केली कारवाई

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**-पनवेल शहर वाहतूक पोलिसांनी जानेवारी ते 31 डिसेंबर 2024 या बारा महिन्यात तब्बल 70 हजार 513 जणांवर कारवाई केली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून पाच कोटी 39 लाख 45 हजार तीन रुपयांचा दंड आकारण्यात आला.पनवेलमध्ये वाहतुकीच्या नियमांचे सर्रासपणे उल्लंघन केले जात आहे. दुचाकीवरून तीन ते चार सीट प्रवास करणे, रिक्षांमधून पुढच्या सीटवर प्रवासी बसवणे, विद्यार्थी वाहनातून कोंबून विद्यार्थ्यांना नेणे, ट्रक, हायवा, डंपरमधून अधिकचे गौण खनिज नेताना दिसून येतात. अनेक वाहन चालक वाहन चालवताना मोबाईलवर बोलताना दिसून येतात. तर अनेक दुचाकी चालक हेल्मेट परिधान करत नाहीत. त्यामुळे अपघात झाल्यानंतर अनेकांचा जीव जातो. त्यामुळे हेल्मेट परिधान करणे आवश्यक आणि तितकेच गरजेचे देखील आहे. पनवेल शहर वाहतूक शाखेकडून वर्षभरात 21 हजार 509 विना हेल्मेट वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्यावर एक कोटी 61 लाख 21 हजार 500 रुपये दंड आकारण्यात आला. वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणाऱ्या 1 हजार 133 जणांवर कारवाई करण्यात आली असून 25 लाख 35 हजारचा दंड आकारण्यात आला. ट्रिपल सीट वाहतूक करणाऱ्या 659 जणांवर सहा लाख 58 हजारांचा दंड आकारण्यात आला. चार चाकी वाहनांमध्ये सीट बेल्ट न वापरणाऱ्या 2 हजार 216 जणांकडून चार लाख 42 हजार 400 रुपयांचा दंड आकारण्यात आला. नो पार्किंग मध्ये वाहन पार्क करणाऱ्या 14 हजार 779 जणांकडून एक कोटी 15 लाख 17 हजार पाचशे रुपयांचा दंड आकारण्यात आला. तर मदय प्राशन करणाऱ्या 124 जणांवर कारवाई करण्यात आली. आणि तीस हजार 83 इतर केसेस असून त्यांच्याकडून दोन कोटी 26 लाख 70 हजार 603 रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

# गोंदियातील रेल्वे ओव्हरब्रिजचे बांधकाम अंतिम मुदत लक्षात घेऊन करावे - बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले

### आमदार विनोद अग्रवाल यांच्या विनंतीवरून आयोजित बैठकीत बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या सूचना

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया-प्रतिनिधी/गोंदियाः -** गोंदिया शहरातील रेलटोली, हड्डीटोली आणि मरारटोली या तीन मार्गांवर रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू झाले आहे. बांधकामाला गती देण्यासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी राज्याचे बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासोबत मुंबई सचिवालयात बैठक घेतली. ज्यामध्ये आमदार विनोद अग्रवाल यांनी पुलाच्या बांधकामासाठी १८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली जेणेकरून सर्व पूल लवकर बांधता येतील, म्हणून आमदार विनोद अग्रवाल यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे ही विनंती केली.गोंदिया शहराच्या मध्यभागी असलेल्या रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम सध्या सुरू आहे. अंतिम मुदत लक्षात घेऊन, बांधकाम जलद गतीने करावे जेणेकरून नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू नये आणि सुविधा उपलब्ध व्हाव्यात. नागरिकांनी लवकरच या प्रकल्पाचे नियोजन करावे. आणि ब्रिजच्या बांधकामात कोणतीही अडचण येऊ नये म्हणून त्याच्या बांधकामासाठी उपलब्ध असलेला निधीही तातडीने मंजूर करावा, अशी मागणी आमदार विनोद अग्रवाल यांनी बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे केली. आमदार विनोद अग्रवाल यांच्या विधानाची दखल घेत बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी संबंधित विभागाला गोंदियातील बांधकामाधीन रेल्वे ओव्हरब्रिजचे बांधकाम अंतिम मुदत लक्षात घेऊन पूर्ण करण्याचे निर्देश दिले.बैठकीदरम्यान आमदार विनोद अग्रवाल यांनी गोंदिया विधानसभा मतदारसंघातील विविध बांधकामांबाबत बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे लक्ष वेधले. ज्यामध्ये आमदार विनोद अग्रवाल यांनी गोंदिया शहरात नवीन विश्रामगृह बांधण्याची प्रमुख मागणी मांडली आणि सांगितले की, गोंदिया महामार्गावर आंतरराज्यीय पूल बांधण्याबरोबरच नवीन आणि सुसज्ज पद्धतीने नवीन विश्रामगृह बांधले जावे. कटंगटोला-पानगाव रस्ता, बनथर-मुंडेसर घाट आंतरराज्यीय पूल बांधकाम, काटी कासा रस्त्याचे बांधकाम, कासा बेनी आंतरराज्यीय पूल बांधकाम यासारख्या इतर विषयांवर बैठकीत चर्चा झाली. ज्यावर बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सकारात्मकता दर्शविली आणि लवकरच सर्वांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. ज्याबद्दल आमदार विनोद अग्रवाल यांनी कृतज्ञता व्यक्त केली.बैठकीला बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, आमदार विनोद अग्रवाल, सचिव श्री. साडूंगे, सचिव श्री. दशपुते, मुख्य अभियंता श्री. नंदनवार, अधीक्षक अभियंता श्री. भानुसे, कार्यकारी अभियंता श्री. लभाने इत्यादी प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



# शिवसेना शाखा देवद तर्फे स्व. मा. हिंदू हृदय सम्राट बाळा साहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)**-शिवसेना शाखा देवद तर्फे स्व. मा. हिंदू हृदय सम्राट बाळा साहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिर आयोजन जयंत पाखरे उपविभाग प्रमुख यांनी केले रायगड संपर्क प्रमुख प्रसाद भोईर विभाग प्रमुख विशाल भोईर, उपविभाग प्रमुख जयंत पाखरे यांच्या हस्ते दीप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले शिबिरात समाजातील गरजू लोकांना उपचाराचे दर परवडत नसल्याने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजित करण्यात आले आहे.आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आरोग्य सुविधा दिवसेंदिवस महागडी सेवा होत चालली आहे. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना आपल्या आरोग्य समस्यांवर उपचार करून घेणे परवडत नाही. अनेक रुग्ण आजारपण आपल्या अंगावर काढतात. यासाठी सर्वसामान्य रुग्णांची तपासणी करने गरजेचे आहे. शिबिरात 229 जणांनी लाभ घेतला. रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर,तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे,देवद विभाग प्रमुख विशाल भोईर उप विभाग प्रमुख जयंत पाखरे, उप शाखा प्रमुख मनोहर भोईर, हेमंत म्हात्रे, भिकाजी चव्हाण, संजय घाणेकर, ऋतिक टावरी, सिद्धेश चव्हाण, विठ्ठल शिगम, विजय जोगले, बिपिन झुरे, अनिल फाठक, योगेंद्र यादव, अर्जुन व्हटकर, तनुजा झुरे,रुहीता कांबळे, ऋतुजा हिर्लेकर, श्रद्धा वायंगणकर, मानसी कदम, उज्वला कांबळे, तनुश्री हिर्लेकर, संजना माने डॉ. शीतल माहुरे. डॉ. पंकज लोखंडे, फिजो थेरपी, डॉ. किरण जाधव, दिर्घाऊ क्लिनि, सूरज जाधव, अपोलो हॉस्पिटलचे डॉ. सुशील प्रसाद, शंकरा आय हॉस्पिटलचे आर झुनझुनवाला, मोरया डेंटल क्लिनिक चे डॉ. आशिष बांदेकर यांच्या सहकार्याने शिबिर पार पडले.




=======================

# निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम या नामघोषात श्री क्षेत्र विष्णुनगर येथून दिंडीचे प्रस्थान

**दै. युवक आधार**

**जनार्दन चव्हाण/विंचूर प्रतिनिधी/विंचूर (नाशिक ):-** विष्णुनगर ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर पायी दिंडी सालाबाधाप्रमाणे ही चाळीस वर्षाची परंपरा विष्णूनगर येथून चालत आलेली आहे वै,ह,भ,प कारभारी मास्तर बाबा यांच्या स्मरणार्थ वै,गु. वै. ह भ. प.दिगंबर महाराज अंमळनेरकर यांच्या कृपा प्रसादाने श्री निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी सोहळा ह.भ. प. एकनाथ महाराज सदगीर व ह. भ.प.देवराम महाराज बोंबले ह. भ. प किसन महाराज शेळके ह.भ.प सयाजी महाराज बोंबले ह.भ. प निलेश महाराज घायाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सदर दिंडीचे सोहळा सोमवार दिनांक 20/01/2025रोजी त्र्यंबकेश्वर कडे प्रस्थान झाले.दिंडीत सामील झालेल्या भावीक भक्तांना यावेळी गावकऱ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात भक्तिमय वातावरणात निरोप देऊन दिंडी मार्गस्थ झाली.या पायी दिंडीचा निफाड,ओढा , नाशिक व त्र्यंबकेश्वर असा मार्गक्रम असणार असून भाविकांना ठिकठिकाणी सकाळ, दुपार, सायंकाळ, रात्री चहा नाश्ता, जेवणाची व्यवस्था संबंधित दानशूरांकडून करण्यात आली आहे. दिंडीत मोठ्या प्रमाणात महिला, पुरुष, अबाल वृद्धांचा समावेश आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या आहीर नोटीसन कळविण्यात येते की, श्रीमती विमल जगन्नाथ पाटील, संपर्क पत्ता कोप्रोली तालुका उरण, जिल्हा रायगड हिच्या मालकी, तावेकबजा, वहिवाटीतील खालील परिशिष्टात नमुद केलेल्या तीन जमीन मिळकती आहेत. सदर मिळकती विक्री करणेचे ठरविले आहे.

**मौजे कोप्रोली, तालुका-उरण, जिल्हा रायगड**

| भूमापन क्रमांक | उपविभाग | ULPIN | क्षेत्र है. आर | आकार |
|---|---|---|---|---|
| 29 | 2 | 27402240353 | 0-07-10<br>पो. ख 0-01-00<br>--------<br>एकूण 0-08-10 | 1-72 |
| 29 | 4-व | 35500586064 | 0-02-00<br>पो. ख 0-00-50<br>--------<br>एकूण 0-02-50 | 0-9 |
| 29 | 6 | 11576057423 | 0-07-10<br>पो. ख 0-01-00<br>--------<br>एकूण 0-08-10 | 1-62 |

तरी वर नमुद्र तीन जमीन मिळकतीबाबत येथे नमुद तीन जमीन मिळकतीचे मालक यांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचेही गहाण, दान, बोजा, संमततेपत्र, वचनचिठ्ठी, साठेकरार, सामंजस्य करार, समझोताकरार, खरेदीखत ट्रस्ट डीड, पोटगी, वारसा अदलाबदली, हक्कसोडपत्र, भाडेपटटा, वहिवाट, अन्य कोणताही करार-मदार इत्यादी कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, इतर हक्क अधिकार, ताबाबकबजा, वहिवाट इत्यादी अत्तल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी कानदोपत्री पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 14 (चौदा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे तसेच समक्ष माझे वकील ॲड. चेतन मनोहर भोईर यांचेकडे अथवा त्यांच्या खाली नमुद पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी हरकत न आल्यास सदर तीन अमीन मिळकती, निर्वेध बोजारहित आहेत सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत नाही किंवा हरकत असल्यास त्यांनी सोडून दिली आहे असे समजून आमचे अशिल सदर जमीन मिळकतीबाबतचा विक्री व्यवहार पूर्ण करतील. सदर वर नमुद केलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाहीत याची सर्वांनी स्पष्ट नींद घ्यावी.

**तारीख 20/01/2025**

**सही-**
**ॲड. चेतन मनोहर भोईर**
**रा. नवधर पो. ज एन पी टी**
**तालुका उरण नवी मुंबई मोबाईल नंबर ९९३०४७७३०२**

# 24 जानेवारीपासून जेएनपीए प्रशासन भवनासमोर न्याय मिळेपर्यंत शेवाग्रामस्थांचे साखळी उपोषण

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतीनिधी**-मागील ३८ वर्षात सातत्याने केंद्र, राज्य सरकारकडे मागणी, विनंत्या केल्या.जेएनपीए, जिल्हाधिकारी, कोकण आयुक्त, पत्रव्यवहार केला. प्रसंगी विरोधात आंदोलने-उपोषणेही केलीत. मात्र प्रदिर्घ संघर्षानंतरही नवीन शेवा गावाचा पुनर्वसनाचा प्रश्न, समस्या सुटलेल्या नाहीत. स्थानिक पारंपरिक मच्छीमारांच्या आर्थिक नुकसान भरपाई अद्यापही मिळाली नाही.यामुळे आक्रमक झालेल्या नविन शेवा ग्रामस्थांनी 24 जानेवारीपासून जेएनपीए प्रशासन भवनासमोरच न्याय मिळेपर्यंत सर्व पक्षीय साखळी उपोषण सुरू करण्याचा निर्णय पत्रकार परिषदेतून जाहीर केला आहे. जेएनपीटी बंदराच्या प्रकल्पासाठी 1986 साली मुळ शेवा व कोळीवाडा ही दोन्ही गावे विस्थापित केली आहेत. महाराष्ट्र शासनाने कोकण आयुक्त व रायगड जिल्हाधिकारी यांच्या मार्फत नवीन शेवा गावाचे पुनर्वसन बोकडविरा गावाजवळील 10 हेक्टर जमीनीवर तर हनुमान कोळीवाडा गावाचे पुनर्वसन बोरी-पाखाडी या ठिकाणच्या दोन हेक्टर जमिनीवर केले आहे. पुनर्वसन कायद्याप्रमाणे नवीन शेवा गावाचे पुनर्वसन ३३.६४ हेक्टर जागेवर करण्याची आवश्यकता होती.मात्र शासनाने फक्त10 हेक्टर क्षेत्रावरील जागेतच नवीन शेवा गावाचे पुनर्वसन करुन ग्रामस्थांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. या अपुऱ्या जागेतच पुनर्वसन करण्यात आल्याने दाटीवाटीने बांधण्यात आलेल्या घरातच सुमारे 550 कुटुंब वास्तव्य करीत आहेत.शासनाने पुनर्वसन कायद्यालाच फाटा देऊन नवीन शेवा गावाचे अपुऱ्या जागेत पुनर्वसन करण्यात आल्याने मात्र नवीन शेवा आणि हनुमान कोळीवाडा गावातील नागरिकांना



मागील 38 वर्षांपासून अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.यासाठी हनुमान कोळीवाडा व नवीन शेवा या दोन्ही गावांच्या ग्रामस्थांचा पुनर्वसनासाठी मागील 38 वर्षांपासून संघर्ष सुरू आहे.मागील 38 वर्षात सातत्याने केंद्र, राज्य सरकारकडे मागण्या, विनंत्या केल्या.जेएनपीए, सिडको ,जिल्हाधिकारी, कोकण आयुक्त, पत्रव्यवहार केला.प्रसंगी विरोधात मोर्चे, आंदोलनेही केली.मात्र प्रदिर्घ संघर्षानंतरही हनुमान कोळीवाडा व नवीन शेवा गावाचे पुनर्वसन आणि समस्या अद्यापही सुटलेल्या नाहीत. फक्त केंद्र , राज्य सरकारकडून प्रत्येक वेळी पोकळ आश्वासने देऊन प्रकल्पग्रस्तांची फक्त फसवणूकच केली आहे.इतक्या वर्षात जेएनपीए अध्यक्ष, सिडको महाव्यवस्थापक, जिल्हाधिकारी यांची संयुक्त बैठकही झालेली नाही.त्यामुळे अनेक वर्षांपासून विविध प्रश्न प्रलंबित आहेत. हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्या पाठोपाठ आता नवीन शेवा ग्रामस्थांनीही केंद्र, राज्य सरकार व सिडको जेएनपीएविरोधात लढ्याचे रणशिंग फुंकले आहे.नवीन शेवा ग्रामस्थांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि न्यायहक्कासाठी नवीन शेवा ग्रामपंचायत सरपंच सोनल घरत, नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमलाकर पाटील आणि सर्वपक्षीय नेत्यांच्या नेतृत्वाखाली 24 जानेवारीपासून जेएनपीए प्रशासन भवनासमोरच न्याय मिळेपर्यंत सर्व पक्षीय साखळी उपोषण सुरू करण्याचा निर्णय पत्रकार परिषदेतून जाहीर केला आहे.उर्वरित २३ हेक्टर जमीनीचा होईपर्यंत आणि स्थानिक पारंपरिक मच्छीमारांच्या आर्थिक नुकसान भरपाईचा ठोस निर्णय जोवर होत नाही तोपर्यंत आता माघार नाही.आश्वासन नकोत, अंमलबजावणी हवी असे सांगत जेएनपीएचे समुद्र चॅनल बंद करून मालवाहू जहाजे समुद्रातच रोखुनी धरण्याचा निर्धारही आंदोलनकर्त्यांनी पत्रकार परिषदेतून जाहीर केला आहे.नवीन शेवा येथील शांतेश्वरी मंदिरात सोमवारी (२०) सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेसाठी नवीन शेवा ग्रामपंचायतीच्या सरपंच सोनल घरत, नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमलाकर पाटील, चंद्रकांत घरत, पंडित घरत,शैलैश भोईर, हेमंत म्हात्रे, एम.जी.म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य,ग्रामस्थ उपस्थित होते.



दैनिक युवक आधार - उरण तालुक्यातील वेश्वी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अजित पाटील यांची बिनविरोध निवड झाली असून त्यांनी आज उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी आमदार महेश बालदी यांनी अजित पाटील यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी उरण शहर अध्यक्ष कौशिक शहा, प्रदीप नाखवा, प्रसाद पाटील, सुरज म्हात्रे, समीर मढवी, अतुल ठाकूर, आकाश पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# संजू सॅमसनच्या निशाण्यावर असेल धोनीसह या तिघांचा रेकॉर्ड

आयसीसी टी २० वर्ल्ड कप स्पर्धेनंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघांनी आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्यानंतर सातत्याने संजू सॅमसन भारतीय संघाच्या डावाची सुरुवात करताना दिसतोय. सातत्याने मिळालेल्या संधीच त्याने सोनंही करून दाखवलं आहे. त्यामुळेच इंग्लंड विरुद्धच्या मालिकेतही त्याच्याकडून दमदार खेळीची अपेक्षा आहे. दक्षिण आफ्रिकेच्या मैदानात अनेक विक्रमांना गवसणी घातल्यावर आता घरच्या मैदानात पुन्हा त्याला खास कामगिरीची संधी आहे.

**धोनी आणि रैनाला मागे टाकण्याची संधी**-इंग्लंड विरुद्धच्या टी-२० मालिकेत संजू सॅमसनला आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकारांच्या बाबतीत धवन, धोनी आणि रैनाला मागे टाकण्याची संधी आहे. धोनीनं आपल्या टी-२० कारकिर्दीत ९८ सामन्यात ५२ षटकार मारले आहेत. संजूनं ३७ सामन्यात आतापर्यंत ४६ षटकार मारले आहेत.

**आधी धवनच्या विक्रमाला लागणार सुरुंग**-जर संजू सॅमसन याने या मालिकेत १२ षटकार मारले तर तो धनला मागे टाकेल. शिखर धवनने आपल्या कारकिर्दीत आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात ५० षटकार मारले आहेत. धवनला मागे टाकण्यासाठी संजूला तसा एक सामनाही पुरेसा ठरू शकतो. याशिवाय रैनालाही तो मागे टाकू शकतो. रैनानं आपल्या टी-२० कारकिर्दीत ५८ षटकार मारले आहेत.

**आंतरारराष्ट्रीय टी-२० सामन्यात भारताकडून सर्वाधिक षटकार मारणारे फलंदाज**-रोहित शर्मा १५९ सामन्यात २०० पेक्षा अधिक षटकार मारले आहेत. या यादीत सूर्यकुमार यादव दुसऱ्या स्थानावर आहे. ७८ सामन्यातील ७४ डावात विद्यमान भारतीय कर्णधारानं १४५ षटकार मारले आहेत. या यादीत विराट कोहली तिसऱ्या स्थानावर आहे. त्याने १२५ आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात १२४ षटकार मारले आहेत. लोकेश राहुल आणि हार्दिक पांड्या अनुक्रमे ९९ आणि ८८ षटकारासह चौथ्या आणि पाचव्या स्थानावर आहेत.

==================



# सैफ अली खानचा हल्लेखोर भारतात कसा घुसला ?

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर चाकू हल्ला करुन त्याला गंभीर जखमी करणाऱ्या शरीफुल इस्लाम शहजाद मोहम्मद रोहिल्ला अमिन फकिर याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. शरीफुल हा बांगलादेशी नागरिक असून त्याला अटक केल्यानंतर अनेक धक्कादायक खुलासे होत आहेत. शरीफुल भारतात घुसण्यासाठी सात महिन्यांपूर्वी दावकी नदी ओलांडून मेघालयात पोहोचला होता. यानंतर सीम कार्ड खरेदी करण्यासाठी त्याने पश्चिम बंगालमधील रहिवाशाचं आधार कार्ड वापरलं होतं असं वृत्त इंडियन एक्स्प्रेसने मुंबई पोलिसांच्या हवाल्याने दिलं आहे.30 वर्षीय शरीफुलला सैफ अली खानवरील हल्ल्यानंतर तीन दिवसांनी ठाण्यातून अटक केली आहे. चोरीच्या उद्देशाने वांद्रे येथील सैफ अली खानच्या घरात घुसलेल्या शरीफुलने सैफ अली खानवर चाकूने हल्ला केला. मुंबई पोलिसांनी सांगितलं आहे की, बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश केल्यानंतर शरीफुलने आपलं नवा बदलून बिजॉय दास ठेवलं होतं. दावकी नदी ओलांडली-प्राथमिक चौकशीत आढळून आलं आहे की, फकीर ज्या सिमकार्डचा वापर करत होता तो पश्चिम बंगालमधील खुकुमोनी जहांगीर शेख या नावाने नोंदणीकृत होता. पोलीस सूत्रांचा हवाला देत, 'द इंडियन एक्सप्रेस'ने वृत्त दिलं आहे की फकीरने सीमकार्ड मिळविण्यासाठी शेखच्या आधार कार्डचा वापर केल्याचा संशय आहे. तो काही आठवडे पश्चिम बंगालमध्ये फिरला आणि स्वतःसाठी आधार कार्ड बनवण्याचा प्रयत्नही केला, परंतु तो त्यात अयशस्वी झाला. कागदपत्रांची गरज नाही अशा नोकरीची निवड-बंगालमध्ये काही आठवडे घालवल्यानंतर, तो नोकरीच्या शोधात मुंबईत आला. फकीरने कोणतीही कागदपत्रे लागणार नाही अशाच नोकऱ्या शोधल्या. रिपोर्टनुसार, अमित पांडे नावाच्या कामगार कंत्राटदाराने ठाणे आणि वरळी परिसरातील पब आणि हॉटेलमध्ये घरकामाचं काम मिळवून देण्यासाठी फकीरला मदत केली.सुरुवातीला, फकीरने पोलिसांना सांगितलं की तो कोलकाता येथील रहिवासी आहे. तथापि, त्याच्या कॉल रेकॉर्डची तपासणी करताना, अधिकाऱ्यांना बांगलादेशातील नंबरवर अनेक फोन कॉल आढळले. फकीरने बांगलादेशातील त्याच्या कुटुंबाला कॉल करण्यासाठी मोबाइल ॲप्सचा वापर केला होता, असं त्यांनी सांगितलं.त्यानंतर पोलिसांनी आरोपीला त्याच्या कुटुंबातील एखाद्याला फोन करायला लावला. "त्याने त्याच्या भावाला फोन केला आणि त्याचे शाळेतील लिविंग सर्टिफिकेट पाठवण्यास सांगितलं. त्याच्या भावाने ते (प्रमाणपत्र) फकीरच्या मोबाइल फोनवर पाठवले. हा कागदपत्र तो बांगलादेशी नागरिक असल्याचे सिद्ध करण्यासाठी एक भक्कम पुरावा आहे," असं अधिकाऱ्याने पुढे सांगितले.सैफ अली खानच्या घरात प्रवेश करण्यापूर्वी, आरोपीने जवळच्या दुसऱ्या बॉलिवूड सुपरस्टारच्या बंगल्यात घुसण्याचा प्रयत्न केला होता. पण कुत्रे भुंकू लागल्याने त्याला यश आलं नाही. सोमवारी एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं होतं की, फकीरने सैफ अली खानवर त्याच्या अपार्टमेंटमध्ये चाकूने वार केल्यानंतर इमारतीच्या बागेत दोन तास लपून बसला होता



# सारथी संस्थेला शरद पवार यांची अचानक भेट; योजनांची घेतली माहिती

**पुणे** : माजी केंद्रीय मंत्री, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सारथी संस्थेला (छत्रपती शाहू महाराज रिसर्च, ट्रेनिंग अँड ह्यूमन डेव्हलपमेंट) मंगळवारी दुपारी भेट दिली. संस्थेच्या विविध योजनांबाबत त्यांनी विचारणा केली व काही सूचनाही केल्या. मात्र, त्यानंतर पत्रकारांबरोबर न बोलताच ते निघून गेले. संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी नंतर पत्रकारांना या भेटीची माहिती दिली.सारथी संस्थेची स्थापना झाल्यानंतर शरद पवार प्रथमच संस्थेत आले होते. संस्थेकडून विद्यार्थी अभ्यासकांना संशोधनासाठी तसेच पीएच. डी.साठी शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीच्या काही रकमा सरकारकडून संस्थेला मिळालेल्या नाहीत, त्यामुळे संशोधक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही, अशी चर्चा आहे. त्यामुळे पवार यांची ही भेट चर्चेचा विषय झाली. मात्र, ते बोलले नाहीत व काकडे यांनी पवार यांच्याकडून संस्थेची माहिती घेण्यात आली, त्याबाबत त्यांनी काही सूचना केल्या इतकेच सांगण्यात आले.काकडे म्हणाले, पवार यांनी स्वतः संस्थेला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली होती. याचा संस्थेला निश्चितच आनंद आहे. संस्थेचे ९५ विद्यार्थी आयएएस तसेच आयपीएस म्हणून देशभरात कार्यरत आहेत. ७५० जण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन सरकारी सेवेत आहेत. संस्थेच्यावतीने ५ हजार विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. ही सर्व माहिती पवार यांनी घेतली व संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.संस्थेकडून पात्र विद्यार्थ्यांना विविध आधुनिक व्यवसायांचे प्रशिक्षणही दिले जाते. ड्रोनचे प्रशिक्षण घेतलेल्या एका विद्यार्थिनीने पवार यांच्याबरोबर संवाद साधला. संस्थेतून प्रशिक्षण घेऊन आपण आता दरमहा ६० ते ७० हजार रुपये मिळवत असल्याचे तिने पवार यांना सांगितले. या प्रशिक्षणात एआय तंत्रज्ञानाची मदत घ्यावी, अशी सूचना पवार यांनी केली. संस्था राहुरी कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून हे प्रशिक्षण देते, आता दापोली व परभणी कृषी विद्यापीठांमधूनही प्रशिक्षण दिले जाणार आहे. एआयची मदत घेण्याबाबत चर्चा सुरू असल्याची माहिती पवार यांना दिल्याचे काकडे यांनी सांगितले. संस्थेच्यावतीने स्पर्धा परीक्षेबाबत जे प्रशिक्षण दिले जाते, त्यात क्लासेसची निवड करण्याबाबत काही गडबड झाली असल्याची टीका होत आहे. याकडे काकडे यांचे लक्ष वेधले असता त्यांनी असे काहीही नसल्याचे सांगितले. क्लासेसची निवड एका स्वतंत्र समितीच्या माध्यमातून होते. त्याचबरोबर संस्थेकडून काही अधिकारी या क्लासेसना अचानक भेट देत असतात, अशी माहिती काकडे यांनी दिली.



# व्हॅगनआर कारची मोटरसायकलला धडक, तीस वर्षीय तरुण जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : मोटर सायकल चालक करंजाडे खाडी पुलावरून जात असताना व्हॅगनआर कारने भरधाव वेगाने येऊन मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात राजेश विष्णू शेलार (राहणार सेक्टर चार, करंजाडे) हे जखमी झाले. या प्रकरणी कारचालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.20 जानेवारी रोजी मध्यरात्री एकच्या सुमारास राजेश विष्णु शेलार हे एफ झेड मोटरसायकल क्रमांक एम एच 46 बिजी 3713 ने वाशी ते करंजाडे असा प्रवास करत होते. रात्री पावणेदोनच्या दरम्यान ते करंजाडे खाडी पुलावरून सर्विस रस्त्याने जात असताना उतरणीला चिंचपाडा ब्रिज कडून येणारी व्हॅगन आर कार क्रमांक एम एच ०१ ई.एम 10 84 वरील चालकाने भरधाव वेगाने कार चालवली आणि राजेश शेलार यांच्या एफ झेड मोटरसायकलला ठोकर मारून अपघात केला. या अपघातात शेलार यांचे दोन्ही हाताच्या कोपराच्या खाली दोन्ही हात फ्रॅक्चर आणि गुडघ्याला मोठी दुखापत झाली आहे. त्यानंतर कारचालक जखमीला कोणतीही मदत न करता पळून गेला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात व्हॅगन आर कार क्रमांक एम एच ०१ ईएम 1084 वरील चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधिक तपास करत आहेत.



# गयाबाई थोरात व इंद्राबाई ओव्हाळ यांचे दुःखद निधन

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी**-आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील सौ.गयाबाई लिंबराज थोरात यांचे सोमवारी रात्री 11:30 वाजता दुःखद निधन झाले. त्या 75 वर्षाच्या होत्या.इंद्राबाई महादेव ओव्हाळ यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या 80 वर्षाच्या होत्या. या दोघीच्या निधनाने अंभोरा गावामध्ये हळहळ व्यक्त होत आहे





# ग्रामीण भागातील शिक्षणाला बळकटी – पोस्को महाराष्ट्र स्टीलतर्फे हर्णे आदिवासीवाडी शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण.

**प्रतिनिधी :-सचिन पवार**

**माणगांव रायगड/रायगड** :-आज दिनांक २१ जानेवारी रोजी हर्णे आदिवासीवाडी शाळेचा उद्घाटन समारंभ पोस्को कंपनीचे अधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, शिरसाड ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, ग्रामस्थ, निजामपूर केंद्र प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी, पालकवर्ग यांच्या उपस्थितीमध्ये उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात पार पडला. पोस्को महाराष्ट्र स्टीलने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत या शाळेचे संपूर्ण नव्याने बांधकाम करून विद्यार्थ्यांना नवी आशा आणि संधी उपलब्ध करून दिली आहे. या बांधकामामुळे विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या उज्ज्वल भवितव्याचे नवीन पर्व सुरू झाले आहे. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत करण्यात आलेली ही १२ वी शाळा आहे.पूर्वीची स्थिती पाहता, शाळेच्या इमारतीची दुरवस्था, मर्यादित साधने आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना अनेक अडचणी येत होत्या. जुन्या इमारतीमध्ये विद्यार्थ्यांना बसणे धोकादायक होते. मात्र, पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या पुढाकारामुळे आता ही शाळा आवश्यक सुविधांनी युक्त झाली आहे. नवीन इमारतीमध्ये प्रशस्त वर्गखोल्या, पंखे, दिवे, चांगल्या दर्जाची स्वच्छता सुविधा, खेळाचे मैदान आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांना आता या वर्षीचा प्रजासत्ताक दिवस नवीन शाळेत साजरा करता येणार याचा खूप आनंद झाला. शाळेच्या नवीन इमारतीमुळे पटसंख्या वाढेल असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला.उद्घाटनप्रसंगी पोस्को महाराष्ट्र स्टीलचे वरिष्ठ अधिकारी श्री. सँग कुग हन यांनी सांगितले की, ही शाळा केवळ एक इमारत नसून या भागातील विद्यार्थ्यांसाठी नवी संधी आहे, शिक्षणामुळे भविष्य उज्ज्वल होऊ शकते, आणि पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून हे सुनिश्चित केले आहे की, इथल्या प्रत्येक विद्यार्थ्याला शिकण्यासाठी उत्तम सुविधा मिळतील. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी या नव्या शाळेच्या विकासाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. काही पालकांनी सांगितले की, "आमच्या मुलांना आता सुरक्षित वातावरणात शिकता येणार तसेच चांगल्या सुविधा मिळणार आहेत, याचा आम्हाला आनंद आहे." विद्यार्थ्यांनीदेखील नवीन शाळा बघून आनंद व्यक्त केला आहे. या मंगल समयी शाळेत आंबा, चिक्कू, पेरू, जांभूळ, फणस या फळझाडांची लागवड देखील केली.पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी शिक्षणासोबतच आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. स्थानिक समुदायाच्या विकासासाठी ही कंपनी सातत्याने कार्यरत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण हा या उपक्रमांचा एक महत्त्वाचा घटक आहे. उत्कृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधांमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये जिल्हा परिषद शाळांबद्दल ओढ निर्माण होईल अशी आशा वाटते. हा प्रकल्प केवळ एक सामाजिक उपक्रम नसून, भविष्यातील सुशिक्षित आणि प्रगत समाजाच्या निर्मितीच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. पोस्को महाराष्ट्र स्टीलने घेतलेला हा पुढाकार इतर उद्योगांसाठीही प्रेरणादायी ठरेल.




====================

# ताराराणी ब्रिगेड संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा शिवमती वंदनाताई मोरे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**रसायनी आनंद पवार**-सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ताराराणी ब्रिगेड संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमती वंदनाताई मोरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. चांभाली येथील अशोक भाऊ मुंढे यांच्या फार्म हाऊसवर सोमवारी संपन्न झालेल्या शिवमती वंदनाताई मोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक क्षेत्रात अविरतपणे कार्य करणाऱ्या शिवमती वंदनाताई मोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला गडचिरोलीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख तथा वाहतूक संघटना महाराष्ट्र राज्य सरचिटणीस महेश केदारी,कर्जत येथील शिव कामगार सेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष अनिकेत मते, जेएनपीटीचे प्रोजेक्ट कॉर्डिनेटर राज केळशीकर, लोणावळ्यातील सामाजिक कार्यकर्ते नामदेव खवळे, काँग्रेस पक्षाचे नेते तथा चांभाली ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अशोक भाऊ मुंढे वरण विधानसभा मतदारसंघाचे शिंदे गटाच्या शिवसेना उपजिल्हाप्रमुख वैजयंती ठाकूर, समता परिषदेच्या संतोषी मोरे, काव्या मोरे, खोपोली नगरपालिकेचे माजी नगरसेवक नितीन पवार, सामाजिक कार्यकर्ते शफीक अख्वास शेख,हनीफ ईय्याक शेख, मेहबूब शेख,एडवोकेट दीपाली पाटील आदी मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



==================

# करंजाडे वडघर मध्ये स्वतंत्र पोलीस ठाणे उपलब्ध करून देण्यात साठी पत्र



**दैनिक युवक आधार**

**रुपेश राजे कारंजाडे** -शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे करंजाडे - वडघर शहर !! आपलं करंजाडे आपली जबाबदारी !! नागरिकांना होणाऱ्या समस्यांचा वाचा फोडण्यासाठी पनवेल वरिष्ठ पोलीस निरीक्षक माननीय श्री नितीन ठाकरे साहेबांना करंजाडे , वडघर नोड मध्ये लवकरात लवकर स्वतंत्र पोलीस ठाणे उपलब्ध करून देण्यात साठी पत्र दिले यावेळी पनवेल शहर पोलीस स्टेशन दक्षता कमिटीच्या सौ रामेश्वरी सुनील जांभळे तसेच युवा सेना शहर प्रमुख श्री निखिल भोपी उपस्थित होते.यावेळी श्री नितीन ठाकरे साहेबांनी पोलिसांच्या गस्ती वाढवल्या जातील आणि येणाऱ्या तक्रारी वरती लगेच अक्शन घेऊन तक्रारीचे निवारण करण्यात येईल तसेच करंजाडे वडघर मध्ये लवकर लवकर बीट पोलीस स्टेशन करण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.. याची पोच खालील प्रमाणे देण्यात आली आहे.

==================